मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया (मराठी)

अंक २ • वर्ष १५ वे • पृष्ठे ५२ • फेब्रुवारी - २०१८



# हसती दुनिया (मराठी)

बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट

अंक २ • वर्ष १५ वे • पृष्ठे ५२ • फेब्रुवारी २०१८

संपादक
राजेंद्र थोरात

सहसंपादक
सुरेश तिर्लोटकर

सजावट व चित्रे
उदय सत्यवान पांगे
राजनंदन पिंपळकर

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेज-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल
marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

| वर्गणी | १ वर्ष | ५ वर्षे |
|---|---|---|
| भारत/ नेपाळ | रु. १५०/- | रु. ७००/- |
| यु.के. | £ 15 | £ 80 |
| युरोप | € 20 | € 100 |
| अमेरिका | $ 25 | $ 120 |
| कनाडा/ ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 140 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९







## कथा


- धन्य ते नरकेसरी ०५
- दशाननाला रावण हे ... ०६
- मानवी शिराची किंमत ०८
- बाप से बेटा सवाई १४
- देव थोर म्हणावा की .... ४२
- चोरावर मोर ४८




## स्तंभ



- दोन शब्द ०४
- शब्दकोडे १०
- दादाला विचारु या ११
- विचारपुष्प १२
- आरोग्याचा मंत्र २४
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे २८
- दिव्यवाणी ३०
- हसा मुलांनो हसा ३२
- सामान्य ज्ञान ४६
- चित्र काढा आणि रंग भरा ५०






## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३६

## विशेष व प्रेरक प्रसंग


- आठवणीतील प्रसंग ०७
- तेजस्विनी -७० २०
- शौर्यगाथा २१
- दुर्गभ्रमंती २२
- व्यक्तिविशेष २३
- थोडक्यात माहिती ..... ३१
- समर्थ दर्शन -४० ३४
- आपले जिल्हे ४४
- परीक्षा जवळ येत आहे ४५
- पक्षीजगत ४७


## कविता


- बाल सेवादल २९
- कधी रे येशील ..... ३५

# जशी दृष्टी तशी सृष्टी

जीवनात एखाद्या वेळी अपयश किंवा दु:ख आलं, की माणूस सहज बोलून जातो, देवा! हे दु:ख माझ्याच वाट्याला का? ईश्वरावर पक्षपात केल्याचा दोष देऊन आपण मोकळे होतो. वास्तविक ईश्वराला सारे समान आहेत. दोष आपल्या दृष्टीचा आहे.

एकदा दुर्योधनाने श्रीकृष्णाला विचारले, "कृष्णा, तूही आमचा बंधू आहेस तरीही तुझी कृपादृष्टी आमच्यापेक्षा पांडवांवरच का?" त्यावर श्रीकृष्ण स्मितहास्य करत म्हणाले, "दुर्योधना, आधी माझं एक काम कर, मग तुझ्या प्रश्नाचं उत्तर मी देतो. द्वारका नगरीत फेरफटका मारुन एखाद्या सज्जन व्यक्तीला शोधून माझ्याकडे घेऊन ये." त्यानंतर ते युधिष्ठिराकडे वळून म्हणाले, "तू ही द्वारकेत जा आणि एखादा वाईटातला वाईट माणूस सापडला तर घेऊन ये."

दोघेही आपल्या कामगिरीवर गेले. यथावकाश फिरुन दुर्योधन आला व म्हणाला, "द्वारकेत एकही सज्जन व्यक्ती नाही, सारे दुष्ट आणि पापी आहेत." त्यानंतर युधिष्ठिर आला व म्हणाला, "केशवा! द्वारकेत सर्वच माणसं चांगली आहेत; वाईट कुणीच नाही."

श्रीकृष्ण दुर्योधनाला म्हणाले, "दुर्योधना, तुझ्या प्रश्नाचं उत्तर तुला सापडलं की नाही?" दुर्योधन म्हणाला, "नाही. मला नीट समजावून सांग." श्रीकृष्ण म्हणाले, "द्वारका नगरीही एकच आहे, तुम्ही दोघांनी पाहिलेली माणसंही तीच आहेत; पण तुमच्या दोघांच्या दृष्टीप्रमाणे युधिष्ठिराला ती माणसं चांगली तर तुला वाईट दिसली. तसं, माझं सर्व मानवमात्रावर सारखंच प्रेम आहे; पण फरक आहे तो तुमच्या पाहण्याचा, तुमच्या दृष्टीचा."

सद्‌गुरु बाबा हरदेवसिंहजींनी मानवमात्राला संदेश देताना हेच सांगितले, "जशी दृष्टी तशी सृष्टी." ते एवढेच सांगून थांबले नाहीत, तर युधिष्ठिराला जी दृष्टी प्राप्त झाली होती, तीच दृष्टी त्यांनी विश्वातील मानवमात्राला प्रदान करण्याचं कार्य केलं. ब्रह्मज्ञानानेच अशी दृष्टी प्राप्त होत असते. ब्रह्मज्ञानामुळे जीवनाकडे, जगाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. ज्याला ही ज्ञानदृष्टी प्राप्त होते त्याच्यासाठी कुणी परका राहत नाही. सारे आपलेच वाटू लागतात. सकल प्राणिमात्रात त्याला केवळ एकच ईश्वरी तत्त्व दिसून येते. आज गरज आहे ती दृष्टी प्राप्त करण्याची! ही दृष्टी सद्‌गुरुकृपेने सर्व मानवमात्राला प्राप्त होवो हीच प्रार्थना!

- राजेंद्र थोरात

बोधकथा - विनोद अधिकारी (भूजल तज्ज्ञ)



# धन्य ते नरकेसरी



राजर्षी शाहू महाराज कोल्हापूरहून मुद्दाम खास लोकमान्य टिळकांना भेटण्यासाठी म्हणून पुण्याला गायकवाडवाड्यात आले होते. त्या दोघांच्यात काही वैचारिक मतभेद निर्माण झाले होते. कोल्हापूरच्या ज्या वतनदारांची वतने शाहू महाराजांनी रद्द केली होती त्या वतनदारांची बाजू घेऊन लोकमान्यांनी शाहू महाराजांवर कडाडून टीका केली होती. पण महाराज आपल्या निर्णयावर ठाम होते. तळागाळातल्या बहुजन समाजाला मायेची ऊब अन् मदतीचा हात देणारा हा छत्रपती समाजाच्या सर्वांगीण उन्नतीचे आपले स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्यासाठी राजवाड्यातून महारवाड्याकडे वळला होता. त्या काळात दलितांना पशुहून कमी लेखले जात होते. त्या काळात महाराजांनी दलितांना वकिलीच्या सनदा देण्याचे जगावेगळे धाडस दाखविले होते. आपल्या अठ्ठावीस वर्षाच्या कर्तृत्वसंपन्न कारकिर्दीत शाहू महाराज व्यसने, चैनबाजी, अहंकार, आळस या दुर्गुणांपासून चार हात दूर होते. ते नम्रता, सेवावृत्ती, संवेदनशीलता, सत्य, सुसंस्कृतपणा, जनसेवा, समानता या सद्‍गुणांची पूजा करीत होते. म्हणून लोकमान्य टिळकांनी त्यांच्यावर एवढी टीका करुनही मोठ्या मनाचा हा राजा आपण होऊन त्यांना भेटायला गेला होता. लोकमान्य टिळकही या राजर्षीची योग्यता पुरेपूर जाणून होते. त्यांनी शाहू महाराजांचे स्वागत व आदरातिथ्य यथोचित केले. चर्चा झाली, विचारविनिमय झाला. गैरसमजुतीचे ढग निवळले. शाहू महाराज परत निघाले. तेवढ्यात लोकमान्यांच्या लक्षात आले, की महाराज आपला फेटा टेबलावरच विसरले. त्यांनी महाराजांना त्याची आठवण करुन दिली. महाराज म्हणाले, "रागावू नका बळवंतराव, पण तो फेटा तुम्हीच आमच्या मस्तकावर ठेवावा, अशी आमची इच्छा आहे." टिळकांनी तत्परतेने महाराजांच्या मस्तकावर स्वहस्ते फेटा चढविला अन् दाखवून दिले, की आपल्या विरोधकांचाही योग्य तो सन्मान करण्याइतपत आपण विचाराने व आचाराने परिपक्व आहोत. धन्य ते दोन्ही नरकेसरी!

थोर व्यक्तिंचे आचार-विचार आणि व्यवहारही थोर असतात. म्हणूनच ह्या थोर विभूती इतिहासात अजरामर बनल्या.

पौराणिक कथा

# दशाननाला रावण हे नाव मिळाले

लंकापती रावणाने कुबेरावर कपटाने विजय मिळवून त्याचे पुष्पक विमान पळवून आणले होते. एकदा तो आपल्या मंत्रिगणांसह पुष्पक विमानात बसून स्कंदवनातून जात होता. तेव्हा विमानाची गती अडखळली. स्कंदवनातील कुणीतरी विमानाच्या गतीला अडथळा आणत आहे हे रावणाने ओळखले. तेवढ्यात भगवान शंकरांचा पार्षद नंदी रावणासमोर आला आणि म्हणाला, "दशानना, मागे फिर. या पर्वतावर भगवान शंकर विहार करत आहेत. तेव्हा इथं कोणत्याही प्राण्याला येण्याची बंदी आहे."

रावण रागारागाने पुष्पक विमानातून उतरला आणि उर्मटपणाने म्हणाला, "कोण हा शंकर ?" त्याचवेळी हातात चमचमणारा त्रिशूल घेऊन प्रतिशिवासारखा दिसणारा नंदी प्रकट झाला. त्याचे तोंड वानरासारखे होते. त्याला पाहून रावण त्याची कुचेष्टा करत हसू लागला. तेव्हा नंदी खवळला. त्याने रावणाला शाप दिला, "हे दशग्रीव, मला वानररुपात पाहून तू माझी चेष्टा करत माझ्यावर हसलास तेव्हा तुझ्या कुळाचा विनाश करण्यासाठी माझ्याचसारखे रुप असलेले पराक्रमी आणि तेजस्वी वानर निर्माण होतील. त्यांचा वेग तीव्र असेल. ते एकत्र येतील आणि मंत्री, पुत्रासह तुझा गर्व-अभिमान चक्काचूर करतील." परंतु नंदीच्या या शापाची रावणाने अजिबात पर्वा केली नाही. उलट तो उर्मटपणे म्हणाला, "ज्या पर्वतामुळे माझ्या विमानाची गती रोखली, तो हा पर्वतच मी मुळासकट उखडून टाकतो." असे म्हणून रावणाने आपले अजस्त्र बाहू पसरुन जोर लावला, तसा पर्वत डळमळू लागला. त्या पर्वतावर विहार करणाऱ्या भगवान शंकरांनी डगमगणाऱ्या पर्वताला आपल्या पायाच्या अंगठ्याने दाबले. पण रावणाचे दोन हात पर्वताखाली चिरडले जाऊ लागले. रावण मोठमोठ्याने विव्हळू लागला. तेव्हा मंत्रिगण नंदीला शरण जात म्हणाले, "महाराज, आता तुम्हीच उपाय सांगा." नंदी म्हणाला, "भगवान शंकरांना शरण जा. त्यांची स्तुती करा." रावण भगवान शंकरांना शरण जात त्यांची स्तुती करु लागला. महादेव प्रसन्न होत म्हणाले, "दशानना, पर्वताखाली दबलेल्या तुझ्या भुजा मी मुक्त करीत आहे. तुझ्या वेदनांनी प्राणिमात्रांना देखील रडू आले. प्राणिमात्राला रडविणारा म्हणून यापुढे लोक तुला रावण म्हणून ओळखतील." यापूर्वी तो दशानन, दशग्रीव म्हणून ओळखला जाई. भगवान शंकरांकडून वरदान मिळवून रावण पुष्पक विमानाने खूप फिरला. अनेक राजांना त्याने त्रस्तही केले. अनेक अत्याचारही केले.

❍ क्रमशः

# डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या बालपणीची एक हृदयस्पर्शी आठवण

मी लहान होतो तेव्हाची गोष्ट. प्रत्येक आईप्रमाणेच माझी आई आम्हा सर्वांसाठी जेवण तयार करायची. दिवसभर कष्टाची कामे करुन आई खूप दमून जायची. एके रात्री आईने स्वयंपाक केला आणि माझ्या बाबांना जेवायला वाढले. त्यांच्या ताटात एक भाजी आणि एका बाजूने पूर्णपणे करपलेली भाकरी दिली. त्या जळालेल्या, करपलेल्या भाकरीबद्दल ते काही बोलतात का याची मी वाट पहात होतो. परंतु बाबांनी आपले जेवण शांतपणे संपवले आणि मला जवळ घेऊन माझ्या शाळेतील आजच्या दिवसाची विचारपूस करु लागले.



मला आता आठवत नाही मी त्यांना तेव्हा काय सांगितले होते; पण एक गोष्ट मला आजही आठवतेय, ती म्हणजे करपलेल्या भाकरीबद्दल आईने मागितलेली माफी....!

यावर बाबांनी दिलेलं उत्तर मी कधीच विसरलो नाही. माझे बाबा खूप समजूतदारपणे माझ्या आईला म्हणाले, "असं काही नाही गं, मला करपलेली भाकरी खूप आवडते."

झोपी जाण्यापूर्वी मी बाबांजवळ गेलो आणि त्यांना विचारले, "खरंच तुम्हाला करपलेली, जळालेली भाकरी आवडते का ?"

त्यांनी मला खूप प्रेमाने आपल्या कवेत घेतले आणि समजावले, "तुझी आई दिवसभराच्या कामाने खूप थकून गेलेली असते. करपलेल्या भाकरीने मला कोणताच त्रास होणार नाही, पण मी जर त्याबद्दल तिच्यावर ओरडलो तर तिच्या हृदयाला खूप वेदना होतील. बेटा, तुला माहीत आहे का, आयुष्य खूपशा अपरिपूर्ण गोष्टीनं भरलेलं आहे आणि मी पण परिपूर्ण नाही."

मी माझ्या आयुष्यात इतर सोहळे विसरलो तरी एक गोष्ट कायम हृदयावर कोरून ठेवलीय. प्रत्येक नाते जपण्यासाठी एकमेकांचे दोष स्वीकारायचे आणि नात्याचा आनंद घेत रहायचे. आयुष्य खूप छोटे असते. जे लोक तुम्हाला योग्य वागणूक देतात त्यांच्यावर प्रेम करा. जे देत नाहीत त्यांच्याबद्दल मनात आत्मियता ठेवा...

❒ : साभार



कथा

# मानवी शिराची किंमत

एका नगरात राजाची मिरवणूक (शोभायात्रा) निघाली होती. राजा हत्तीवर स्वार झाला होता. राजाच्या अवतीभोवती घोडेस्वार, सैनिक, प्रधान व हजारोंच्या संख्येने जनसमुदाय शोभायात्रेत सामिल झाला होता. वाजत गाजत राजाची मिरवणूक नगराच्या दिशेने हळूहळू चालत होती. समोरुन आपले सद्‌गुरु येताना राजाच्या दृष्टीस पडताच राजा हत्तीवरुन खाली उतरला व आपल्या सद्‌गुरुच्या चरणी नतमस्तक झाला. राजाने शिरावर असलेल्या सोन्याच्या मुकुटासहित आपल्या सद्‌गुरुच्या चरणी शिर झुकविले. हे दृश्य पाहून हजारो जनसमुदाय व प्रधान अचंबित झाले.

राजाने एका फाटक्या कपड्याच्या माणसाच्या पायावर डोके का ठेवले? हे ठीक केले नाही. हा प्रश्न प्रधानजींनी राजाला विचारला. राजाने सांगितले, मिरवणूक राजदरबारात घेऊन चला, मी तुमच्या प्रश्नाचे उत्तर देतो. ठरल्याप्रमाणे मिरवणूक राजदरबारात आली. राजाकडून प्रश्नाचे उत्तर ऐकण्यासाठी राजदरबार खचाखच भरला होता.

राजाने प्रधानजींना सांगितले, की मी माझ्या सद्‌गुरुच्या चरणी माझे शिर का झुकविले याचे उत्तर हवे असेल तर सर्वप्रथम तुम्हाला तीन कामे करावी लागतील. एका हरणीचे शिर घ्या, दुसरे वाघाचे शिर आणि तिसरे माणसाचे शिर. ही तिन्ही शिरे बाजारात नेऊन विका. त्या शिरांची जी किंमत येईल ती मला आणून द्या. मग मी तुमच्या प्रश्नाचे उत्तर देतो.

प्रधानाने ताबडतोब एका मूर्तीकाराला बोलावले व सांगितले, की मला दोन दिवसात एका हरिणीचे, एका वाघाचे व एक माणसाचे शिर बनवून पाहिजे. विशेष म्हणजे ती तिन्ही शिरं अगदी जिवंत आहेत असे वाटले पाहिजे.

मूर्तीकाराने प्रधानांच्या सांगण्यानुसार अगदी हुबेहूब माणसाचे, हरिणीचे व वाघाचे शिर बनवले व प्रधानजींकडे आणून दिले.

दुसऱ्या दिवशी प्रधानजी ही तिन्ही शिरे घेऊन सेवकांसह बाजारात विकण्यास गेला. काही शौकिन लोकांनी हरिणीचे व वाघाचे शिर विकत घेतले; परंतु माणसाचे शिर विकत घेण्यास कोणीही तयार होईना. सेवक संध्याकाळपर्यंत ते माणसाचे शिर बाजारात घेऊन बसले होते. परंतु त्याच्याकडे कुणी ढूंकुनही पाहत नव्हते. शेवटी कंटाळून सेवक ते शिर घेऊन परत राजवाड्यात आले. ते शिर राजापुढे ठेवण्यात आले. तेव्हा राजा म्हणाला, याची किंमत कमी आली तरी चालेल नाहीतर फुकट कोणाला तरी देऊन या.

दुसऱ्या दिवशी सेवकांनी पुन्हा ते शिर विकण्यासाठी बाजारात आणले. दुपारपर्यंत कोणीही गिऱ्हाईक त्याच्याकडे पाहत नाही हे पाहून संध्याकाळी सेवकांनी ते फुकट देणार असे सांगितले. परंतु तरीदेखील ते कोणी घेण्यास तयार होईना. कंटाळून सेवक परत आले.

राजाने प्रधानजी व सेवकांना सांगितले, की सर्व प्राणी, पशुपक्षी यांची किंमत आहे; पण माणसाची किंमत शून्य आहे. माणसाच्या शिराची किंमत फक्त सद्‌गुरु चरणी नतमस्तक

❑❑❑

गुरुभक्त जेव्हा इतरांची प्रगती होताना पाहतो, तेव्हा तो मनोमन खूप आनंदित होतो आणि ईश्वराकडे त्यांच्यासाठी हीच प्रार्थना करतो, की त्यांची उत्तरोत्तर अशीच प्रगती होत राहो. त्यांची यश-कीर्ती वाढत राहो.

जर अशा भावना प्रत्येकाच्या बनल्या तर जगात सुख-शांतीचं साम्राज्य नांदेल.

- निरंकारी बाबा हरदेवसिंहजी महाराज

# शब्दकोडे

## १६३

❍ विकास अरोडा (रेवाडी-हरियाणा)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ■ | ३ | | ४ |
| | ■ | | ■ | | ■ | |
| ■ | ५ | | ६ | ■ | ७ | |
| ■ | | ■ | ८ | | | ■ |
| ९ | | १० | | ■ | | ■ |
| | ■ | | ■ | ११ | | १२ |
| | ■ | | ■ | | ■ | |
| १३ | | | | | ■ | ■ |

## आडवे शब्द

१. भगवान श्रीकृष्ण या पांडवाचे सारथी बनले होते.

३. एक अवयव, ज्यामुळे श्वसनक्रिया चालते.

५. भगवान श्रीकृष्णाचा बालमित्र

७. 'केसरी' या वृत्तपत्राचे संस्थापक (फक्त नाव)

८. महात्मा गांधी हे पेशाने ............ होते.

९. फुलातील मध गोळा करणारा कीटक

११. पणजी शहर हे या नदीवर वसलेले आहे.

१३. ............ या राक्षसाचा देवीने वध केल्यामुळे नवरात्रौत्सव साजरा केला जातो.

## उभे शब्द

१. भारतीय संस्कृतीतील दुसरा पुरुषार्थ

२. डायनासोरचे अवशेष भारतात कोणत्या नदीच्या काठी सापडले?

३. सत्यशोधक समाजाचे संस्थापक : महात्मा.......

४. संध्याकाळच्या विरुध्द

५. दुर्गंध या शब्दाच्या उलट

६. आईची बहीण

७. रामचरितमानसचा प्रथम खंड

९. केरळ राज्यात बोलली जाणारी मुख्य भाषा

१०. मराठी ही महाराष्ट्रीयन लोकांची ........... आहे.

११. टॉम अँड जेरी या कार्टूनमध्ये टॉम एक ......... आहे व जेरी एक उंदीर आहे.

१२. जागतिक सामाजिक न्याय दिन फेब्रुवारी महिन्याच्या ........... तारखेला साजरा करतात.

उत्तरे इतरत्र

# दादाला विचारु या

**प्रश्न : निरंकारी बाबा हरदेवसिंहजींनी मिशनचा कोणता संदेश जनमाणसाला दिला ?**

**उत्तर :** आपण संकुचितपणा, क्रोध, वैर-द्वेष यापासून स्वत:ला दूर ठेवून सहनशीलता धारण करत सहजजीवन जगायचे आहे.

**प्रश्न : बाबा हरदेवसिंहजींनी सत्संगाचा अर्थ आणि महत्त्व काय सांगितले आहे ?**

**उत्तर :** ब्रह्मज्ञान सद्‌गुरुच्या कृपेने प्राप्त होत असते; परंतु ब्रह्मज्ञानावर, या निरंकार प्रभु-परमात्म्यावर विश्वास सत्संगात आल्यानंतरच दृढ होत असतो. जस-जसे आपण सत्संग करतो तस-तसे मन स्थिर आणि शांत होत जाते. सत्संगाचा अर्थ असा नाही, की येऊन पुतळ्यासारखे बसून राहायचे, सत्संगाचा अर्थ आहे, अतिशय लक्षपूर्वक संत-महापुरुषांचे विचार श्रवण करावेत व त्यावर मनन-चिंतन करुन ते जीवनात उतरवावेत.

**प्रश्न : गुरुभक्तांनी आपलं जीवन सुखी करण्यासाठी कोणती सावधगिरी बाळगावी असे बाबा हरदेवसिंहजी यांना वाटत होते ?**

**उत्तर :** गुरुभक्त सेवा-स्मरण-सत्संगाची जी कमाई करतो ती निंदा-वैर-द्वेष याद्वारे गमावून बसतो. शेकडोने कमवतो, पण हजारोने गमावतो. त्यामुळे गुरुभक्त जर निंदा-वैर- द्वेष इ. दुर्गुणांपासून दूर राहिला तर दातार-प्रभु त्याची झोळी सुखाने भरत राहील. जीवन सुखी करण्यासाठी गुरुभक्ताने अशा गोष्टींपासून सदैव दूरच राहिले पाहिजे असे ते सांगत.

**प्रश्न : बाबा हरदेवसिंहजींनी आपल्या सहनशीलतेचा परिचय कसा दिला ?**

**उत्तर :** बाबा गुरबचनसिंहजींच्या हत्येनंतर ज्यावेळी गुरुभक्तांमध्ये-जनसामान्यांमध्ये क्रोधाची, सूडाची भावना जागृत झाली होती, त्यावेळी बाबा हरदेवसिंहजींनी सांगितले, "बाबा गुरबचनसिंहजींची शिकवण घरा-घरात पोचवून लोकांचं वैचारिक परिवर्तन करणे हाच आपला बदला असेल. आपल्या मनात कुणाविषयीही कटुता येऊ नये, सूडाची भावना येऊ नये हीच त्यांच्यासाठी श्रध्दांजली असेल." यावरुन त्यांची अपार सहनशीलता दिसून येते.



# सद्गुरु वचनामृत

## सकारात्मक भाव बनवा

एक गृहस्थ गाडी चालवत होता. त्याच्या कानात हेडफोन होते. गाणी ऐकत-ऐकत तो गाडी मजेत चालवत होता. गाण्याच्या तालावर बसल्या बसल्या जवळजवळ नाचतच होता. अचानक त्याच्या गाडीचा टायर पंक्चर झाला. त्या गृहस्थाने गाडी रस्त्याच्या कडेला लावली. तो गाडीतून उतरला. परिस्थितीचं निरीक्षण केलं. गाणी ऐकता-ऐकताच डिकी उघडली. जॅक, स्टेपनी, पाने बाहेर काढले. पंक्चर झालेलं टायर त्याने बदललं. हे करत असताना त्याचं गाणं ऐकणं, मान डोलवणं चालूच होतं. गाण्याचा आनंद घेत त्यानं हे सर्व काही केलं आणि पुन्हा गाडीत बसून पुढच्या

प्रवासाला निघून गेला. संत-महात्मा देखील येणाऱ्या प्रसंगाला असंच तोंड देतात. कुठल्याही प्रसंगाने खचून न जाता निराकार-ईश्वराच्या ध्यान-स्मरणात तल्लीन राहून आपली मनोवस्था बिघडू देत नाहीत. काहीवेळा आपण चुकीच्या धारणा बाळगतो आणि स्वत:चं नुकसान करुन घेतो. आपण तंत्रज्ञानामध्येही पाहतो, की कॅमेऱ्यात काढलेल्या फोटोत फोटोशॉप या ॲपच्या सहाय्याने बदल केले जातात. एखादा फोटो जोडला जातो तर एखादा काढून टाकला जातो. हे तंत्रज्ञान जसं माणसाच्या बुध्दीतून आलेलं आहे, तसं माणसाच्या बाबतीतही तो आपल्या फायद्याच्या दृष्टिकोनातूनच माणसाकडे पाहत असतो. ज्याचे विचार माझ्याशी जुळतात, ज्याच्यापासून मला फायदा आहे. त्यांच्या दोषांकडेही दुर्लक्ष केलं जातं. एखाद्याची योग्य गोष्टही या दृष्टिकोनामुळे अयोग्य वाटू लागते. परंतु जो या निराकार ईश्वराशी जोडलेला असतो त्याच्यात सकारात्मक भाव येतात. प्रत्येकामध्ये तो निराकार प्रभुचंच दर्शन करत असतो.

एके ठिकाणी वाचायला मिळालं. Your life becomes a master piece if you learn masterpeace. आपण जर शांततापूर्वक जीवन जगलो तर आपलं जीवन उत्कृष्ट कृती बनतं. आपण कोणत्याही गोष्टींनी प्रभावित होऊन भक्तीपासून दूर जात नाही. निरंकार कृपा करो, प्रत्येकाच्या मनात सकारात्मक भाव टिकून राहो.


❑❑❑

## गुरुवंदना

आपण वर्षानुवर्षे बाबाजींसमोर गुरुवंदना करत आला आहात आणि बाबाजींनासुध्दा तुमच्यामध्ये सहभागी करुन घेत. तुम्ही बाबाजींना नाचायला सांगितले, बाबाजी तुमच्यासमोर नाचले. तुम्ही बाबाजींना गीत गायला सांगितले, बाबाजींनी गीतही गायले. स्थानिक वेशभूषा करायला लावली, बाबाजींनी ती वेशभूषासुध्दा केली. बाबाजींनी प्रत्येक गोष्टींमध्ये स्वत:ला सर्वांमध्ये सहभागी करुन घेतले. बाबाजी प्रत्येकासाठी प्रत्येकाबरोबर होते. या सर्वांच्या बदल्यात त्यांची आमच्याकडून कोणती अपेक्षा होती? फक्त एकच अपेक्षा होती, की आमच्या बोलामध्ये, आचरणामध्ये मिशनची शिकवण असावी. एक नेक माणूस बनावे. आपल्या कर्मात गुरुभक्तीचा सुगंध असावा. - हरदेववाणीत सद्‌गुरु बाबाजींनी पद क्र. २८ मध्ये म्हटलय -

श्रध्दा आणि समर्पणाची घेऊनी मनी भावना।
शिष्य सदैव करितसे गुरुचरणी वंदना।
गुरसिख संतान असे गुरुची, माता-पिता ही गुरु असे।
म्हणे 'हरदेव' अतूट हे नाते, गुरु-शिष्या माजी वसे।

**- सद्‌गुरु माता सविंदर हरदेवजी**



कथा

# बाप से बेटा सवाई

फार फार वर्षापूर्वीची गोष्ट आहे. कांचन नगरीत सुंदरसेन नावाचा एक शक्तीशाली आणि बुध्दिवान राजा राज्य करीत होता. त्याच्या दरबारात अनेक विद्वान मंत्री होते, अनेक चांगले राजवैद्य होते, अनेक संगीतकार तसेच कुशल कारागीर होते. एकंदरीत राज्यात असलेल्या कलाकारांना राजा आपल्या पदरी ठेवून त्यांच्या कलेची कदर करीत असे, त्यांचा सन्मान करीत असे. त्यामुळे राजाची प्रजा सुखी समाधानी होती. राज्यात कलह, क्लेश नव्हता, भांडण-तंटा नव्हता. लोक गुण्या गोविंदाने नांदत होते. त्यामुळे प्रजा राजाला देव मानीत असे.

अर्थात त्यामुळे आजूबाजूला असलेल्या राजांना हे पाहवत नव्हते. त्यांचा डोळा या राज्यावर होता. एके दिवशी शेजारच्या राजाने सुंदरसेन राजाकडे एक राजदूत पाठवला. त्या दूताला सांकेतिक भाषेमधून राजाने सुंदरसेनला एक विशेष संकेत देऊन पाठवले होते.

राजदरबार भरलेला असताना तो राजदूत राजाच्या सिंहासनाजवळ आला आणि आपण शेजारच्या राजाचे राजदूत असल्याचे सांगून तो म्हणाला, की मी राजाने दिलेले संकेत आपल्यापर्यंत पोहोचवण्यासाठी आलो आहे. हे ऐकून सुंदरसेन राजाने त्याला सन्मानपूर्वक आसनस्थ होण्यास सांगितले. त्यानंतर राजदूत उठला आणि राजाच्या सिंहासनासभोवार एक खडूने रिंगण काढले आणि

त्याबरोबर राजाला म्हणाला, "महाराज! आपल्या राज्यात सर्व विद्वान लोक आहेत असे आम्ही ऐकून आहोत म्हणून माझ्या सांकेतिक भाषेचा उलगडा करण्यासाठी आपल्या राज्यातील एक सामान्य नागरिक बोलावून त्याच्याकडून मला याचे उत्तर जाणून घ्यायचे आहे."

राजा सुंदरसेन थोडा विचारात पडला. इकडे तिकडे पाहत त्याने आपल्या प्रधानाकडे आपली नजर वळवली. प्रधानाने राजाची आंतरिक भाषा जाणली आणि ताबडतोब एका शिपायाकरवी तिथूनच जवळ राहणाऱ्या एका गुरख्याला राजदरबारात आणण्याविषयी सांगितले.

शिपाई त्वरीत गेला आणि त्याने गुराख्याला राजदरबारात आणून राजासमोर उभे केले. गुराखी प्रथम घाबरुन गेला. परंतु राजा म्हणाला, घाबरण्याचे कारण नाही. हे आमच्या शेजारच्या राजाकडून राजदूत आले आहेत. त्यांनी आपल्या सिंहासनाभोवती एक खडूने रिंगण टाकले आहे तरी या गोष्टीचा आपण उलगडा करावा.

गुराखी म्हणाला, मला १० मिनिटांचा वेळ द्या. मी माझ्या घरी जाऊन लगेच येतो. त्याप्रमाणे गुराखी घरी गेला आणि आपल्या मुलाला बरोबर घेऊन आला. मुलगा सुशिक्षित असून चित्रकार होता. गुराख्याने मुलाला बाजूला घेऊन सांगितले, की एका पिंजऱ्यात अडकलेल्या सिंहाचे चित्र काढ. त्यात सिंह लाचार झाला आहे असे दाखव. मुलाने त्याप्रमाणे चित्र काढून आपल्या वडिलांच्या हातात दिले. गुराख्याने ते चित्र राजदूताच्या हाती दिले त्यानंतर गुराख्याच्या मुलाने एक लहान बाळ खेळण्याने खेळत आहे असे चित्र काढून वडिलांकडे दिले. गुराख्याने ते चित्र राजदूताच्या हाती दिले. राजदूत काय समजायचे ते समजून गेला.

नंतर राजदूताने आपल्याकडचे आणखी एक चित्र काढले आणि ते गुराख्याच्या हाती दिले. त्या चित्रात असे दाखवले होते, की मोठे मैदान आहे आणि ते मैदान पूर्णपणे मुंग्यांनी भरलेले आहे. त्यावर मुलाने त्याच कागदावर सरड्यांचे चित्र काढून सरडे सर्व मुंग्या खात आहेत असे दाखवले. गुराख्याने ते चित्र राजदूताकडे दिले.

राजदूत जे काय समजायचे ते समजून गेला. त्याने गुराख्याला अदबीने नमस्कार केला, राजाला प्रणिपात केला आणि मंत्रिमंडळाला राम राम करुन सर्वांचा निरोप घेतला.

गुराख्याने केलेल्या सांकेतिक प्रश्नोत्तरांच्या बाबतीत सर्व अनभिज्ञ होते. मग राजा गुराख्याला म्हणाला, "गुराखी दादा, आपण राजदूताशी जो काय संवाद केला तो आम्हाला काही समजला नाही. तरी आम्हाला तो समजावून सांगा."

गुराखी म्हणाला, तुमच्या आसनासभोवार खडूने जो गोल केला त्याचा अर्थ आहे आम्ही तुमच्यावर स्वारी करुन तुम्हाला बंदी बनवू. त्याचे उत्तर मी असे दिले, की आमचा राजा जंगलाच्या राजालाही कैद करु शकतो म्हणजे बलाढ्य राजालाही बंदी करु शकतो, तर याचा अर्थ आहे, समोरचा राजा कितीही बलाढ्य असला तरी त्याला सामोरे जाण्याची आमची तयारी आहे.

त्यानंतर लहान मुलाचे चित्र काढून त्याच्यासमोर खेळणी ठेवून राजदूताला दर्शवले, की तुमचा राजा आमच्या राजासमोर एक खेळणारं छोटं मूल आहे.

राजदूताने एक कागदावरील मैदानात भरपूर मुंग्या दाखवल्या त्याचा अर्थ होता आमच्याकडे भरपूर सैन्य आहे. त्याच कागदावर सरड्यांची चित्र काढून तो मुंग्या खाताना दाखवले. याचा अर्थ आम्ही तुमच्या सर्व सैन्याची दाणादाण करु शकतो.

गुराख्याचे व त्याच्या मुलाचे चातुर्य पाहून राजा आणि सर्व मंत्रिमंडळ खूश झाले. राजाने त्याला भरपूर बक्षिस दिले आणि त्याच्या मुलाला आपल्या पदरी ठेवून घेतले. राजा म्हणाला, हा मुलगा म्हणजे बाप से बेटा सवाई.

❑❑❑



*चित्रांकन : दीपक मेहरा (दिल्ली)*

*चित्रांकन –रंग : अजय कालडा*

# आजोबा




यात मी काय करु शकतो ? तू तर माझ्यापेक्षा मजबूत आहेस. तुझ्या मानाने मी फारच कमजोर आहे.
पण जर सोसाट्याचा वारा आला तर त्याने तुझे नुकसान होऊ शकते. आपल्याला वाऱ्याच्या ताकदीचाही आदर केला पाहिजे.
बांबूच्या झाडाचे बोलणे पूर्णदेखील झाले नव्हते, तेवढ्यात पिंपळ म्हणाला....
कितीही जोराचं वादळ आलं तरी माझं काहीच नुकसान करु शकत नाही. माझ्यात भरपूर ताकद आहे. माझी मुळं फार खोलवर पसरलेली आहेत; मी कधीही पडू शकत नाही.


त्याचवेळी मंदपणे चाललेल्या वाऱ्याने बांबूच्या व पिंपळाच्या झाडाचे बोलणे ऐकले.
हे सर्व ऐकून वाऱ्याला फार राग आला व त्याने पिंपळाच्या झाडाला मोठा दणका दिला. थोड्यावेळाने वाऱ्याने वादळाचे रुप धारण केले. त्या वादळात बांबूचे झाड पूर्णपणे वाकले.
वाहणारे वादळ पिंपळाच्या झाडावर जाऊन आदळले; परंतु पिंपळाचे झाड जसे होते तसेच उभे राहिले.


वादळाने आणखी जोर केला आणि पिंपळाच्या मुळावर जाऊन आघात केला. यामुळे झाडाची मुळे थोडीफार कमजोर झाली.
मुळांनी झाडाला पडण्यापासून वाचविण्याचा भरपूर प्रयत्न केला; परंतु जोराचे वादळ असल्यामुळे झाड पडण्यापासून वाचवू शकले नाही आणि ते उन्मळून पडले.
पिंपळाच्या झाडाची अशी झालेली अवस्था पाहून बांबूचे झाड दु:खी झाले आणि विचार करु लागले
पिंपळाच्या झाडाचा शेवटी अंत झाला. जर त्याने माझे ऐकले असते आणि वाऱ्याचा सन्मान केला असता तर....
तात्पर्य : अहंकार हा फार मोठा शत्रू आहे. म्हणून अहंकारापासून दूर राहिले पाहिजे.

# संजुक्ता पराशर



हातात एके ४७ घेऊन घनदाट जंगलात शिरल्यावर तब्बल १६ अतिरेक्यांना एक हाती यमसदनाला पाठवून आणखी ६४ अतिरेक्यांना अटक करणाऱ्या संजूक्ता पराशरची कहाणी स्वतःला अबला समजणाऱ्या देशातील प्रत्येक स्त्रीला माहिती व्हायला हवी.

दिसायला गोरीपान आणि सुंदर अशी संजूक्ता जर कधी आपल्या समोरुन गेली तर तिच्या अफाट कर्तृत्वाची आपण कल्पनाही करु शकणार नाही. एक सामान्य स्त्री लाखो सामान्य पुरुषांनाही जमणार नाही असं काम करते तेव्हा तिच्या कर्तृत्वाचे पोवाडे सोशल मिडीयावर गायले जायला हवेत, पण आम्हाला राजकारण आणि जात, धर्मापलिकडेही आणखी दुनिया आहे हेच मान्य नसतं. त्यामुळे संजूक्ता पराशरच्या फेसबुक पेजला लाखभरही लाईक्स मिळत नाही आणि राजकारणी, सिनेनट मात्र करोडोंनी लाईक्स मिळवतात.

आसामसारख्या मागासलेल्या राज्यातील शाळेत शिकून नंतर दिल्लीच्या जेएनयू मधून डिग्री घेणारी संजूक्ता २००६ मध्ये आयपीएस ची परीक्षा देशात ८५ वा क्रमांक घेऊन उत्तीर्ण झाली. युएस फॉरेन पॉलिसी विषयात तिने पी.एचडी केल्यामुळे ती डॉक्टर संजूक्ता पराशर म्हणून ओळखली जाऊ लागली. तिचं लग्न झालं तेही आयएएस अधिकारी पुरु गुप्तांशी. त्यांना ६ वर्षांचा मुलगा आहे. संजूक्ताची आई त्याला सांभाळते.

संजूक्ताची पोस्टिंग २०१४ मध्ये आसाम मधील सोनीतपूर जिल्ह्यात सुप्रिटेंडंट ऑफ पोलीस म्हणून झाली आणि अग्निदिव्य म्हणजे काय याची प्रचिती तिला रोजच घ्यावी लागली. बोडो अतिरेक्यांनी जिल्ह्यात धुमाकूळ घातला होता. शेकडो लोकांचे बळी गेले होते. आसामच्या घनदाट जंगलात शिरुन त्यांच्याशी मुकाबला करणं म्हणजे मृत्यूला आमंत्रण. हातात एके ४७ घेऊन संजूक्ता सीआरपीएफच्या जवानांना घेऊन जेव्हा घनदाट जंगलात शिरायची तेव्हा जवानानाही दहा हत्तीचं बळ मिळायचं. अनेक मोठ्या मोहिमा यशस्वी झाल्यामुळे अतिरेकीही संजूक्ताच्या नावाने थरथर कापू लागले होते. तिला पत्राद्वारे आणि फोनद्वारे धमक्या येऊ लागल्या होत्या; परंतु शिर तळहातावर घेऊन फिरणाऱ्या संजूक्तावर कसलाच परिणाम झाला नाही. तब्बल १६ अतिरेकी तिने मारले आणि ६४ जणांना अटक केली तेही अवघ्या १८ महिन्यांच्या कारकिर्दीमध्ये. अशा या महान रणरागिणीला आमचा कोटी कोटी सलाम!

# परमवीर मेजर धनसिंह थापा

१९६२ साली चीन-भारत युध्दात मेजर धनसिंह थापा यांनी विशेष शौर्य गाजवलं.

२० ऑक्टोबर १९६२ रोजी मेजर धनसिंह थापा लडाखमध्ये एक चौकी सांभाळत होते. चिनी सैनिकांनी त्या चौकीवर मोठ्या प्रमाणात गोळीबार केला. मेजर थापा यांच्यासोबत फारच कमी सैनिक होते. थोड्याशा सैन्यानिशी थापा यांनी चिनी आक्रमणाला जोरदार प्रतिउत्तर दिले. त्यात शत्रूचे अनेक सैनिक मृत्यूमुखी पडले. शत्रूसैन्याने काही वेळापुरती माघार घेतली; पण थोड्याच वेळाने मोठ्या त्वेषाने त्यांनी आक्रमण केले. यावेळी त्यांची सैन्याची तुकडीही मोठी होती आणि बॉम्बवर्षावही होत होता. मेजर थापा यांनी मोठ्या कौशल्याने चिनी सैनिकांवर हल्ला केला. यात शत्रूसैन्याचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं.

तिसऱ्या वेळी चिनी पायदळाची तुकडी रणगाड्यांसह आक्रमणासाठी सज्ज झाली. यावेळी त्यांच्या आक्रमणात बरेचसे भारतीय सैनिक शहीद झाले. मोजके सैनिक मेजर थापांच्या तुकडीत शिल्लक राहिले होते. चौतीस सैनिकांसह मेजर थापांनी शत्रूसैन्याचा मुकाबला करायला सुरुवात केली. जिवाची पर्वा न करता त्यांचे रणगाडे उद्ध्वस्त केले. या धुमश्चक्रीत ३४ पैकी ७ जवान शिल्लक राहिले. बाकीचे शहीद झाले. मेजर थापा जखमी झाले होते. तरीही त्यांनी अनेक चिनी सैनिकांना टिपले. परंतु शत्रुसैन्याचा वेढा चहूबाजूने पडल्याने चिनी सैनिकांनी मेजर थापांना कैद केले. अनेक वर्षे चीनच्या तुरुंगात हालअपेष्टा सहन केल्यानंतर ते पुन्हा भारतात परतले आणि सेनेत दाखल झाले.

मेजर थापा यांच्या पराक्रमाबद्दल परमवीरचक्राने त्यांना भारत सरकारने सन्मानीत केले.

मेजर थापा यांचा जन्म १० एप्रिल १९२८ रोजी हिमाचल प्रदेशातील शिमला येथे झाला. २८ ऑक्टोबर १९४९ रोजी ते सैन्यात दाखल झाले होते.

## हे ही माहित असू द्या

- जगात सर्वात पहिले पेट्रोल पंप १९०७ मध्ये कॅलिफोर्निया (अमेरिका) मधील रिएटल शहरात स्थापन करण्यात आले होते.
- जगातील पहिले पोस्टकार्ड सन १८६९ मध्ये ऑस्ट्रेलियात वापरात आले.
- जगात सर्वात पहिली ट्रेन २७ सप्टेंबर १८२५ ला ब्रिटनच्या स्टॉकटनपासून आणि डर्लिंगटन पर्यंत चालली.
- जगातला सर्वात जुना खेळ पोलो आहे.
- जगातील सर्वात पहिले मुद्रित पुस्तकाचे नाव हीरक सूत्र असे आहे.
- जगातील सर्वात पहिले फिंगरप्रिंट ब्यूरो सन १८२७ ला कोलकाता येथे स्थापन झाले.
- जगातले सर्वात लांबीचे (झुलणारे) पूल आकाशी काइमो नावाचे आहे. ते जपानमध्ये आहे त्याची लांबी ३९११ मीटर आहे.

# भूषणगड

सातारा जिल्ह्यातील वडूज तालुक्याच्या दक्षिणेकडे साधारण २५-३० कि.मी. वर भूषणगड हा किल्ला आहे. या गावात येण्यासाठी चारही बाजूने रस्ते आहेत. गडाची गडदेवता हरणाईमाता ही अनेकांच्या श्रध्दास्थानी आहे. भूषणगड गावातून किल्ल्याकडे निघाल्यावर आपल्या स्वागताला एक कमान उभी केलेली आहे. येथूनच गडावर जाणाऱ्या पायऱ्यांचा मार्ग नव्यानेच बांधून काढला आहे. भक्तांच्या अर्थसहाय्यातून हा मार्ग व गडाची देवता हरणाई मातेचे मंदिर नव्याने बांधले गेले आहे.

समुद्रसपाटीपासून ९०४ मीटर उंच असलेला भूषणगड चढण्यासाठी पायथ्यापासून २० मिनिटे लागतात. दरवाजाच्या २५ फूट खाली एक वाट तटबंदीच्या खालून उजवीकडे जाते. गडाच्या पश्चिम बुरुजाला वळसा मारुन ती मागच्या बाजूच्या मंदिरापर्यंत जाते. तेथे घुमटीवजा मंदिर आहे. घुमटीमध्ये देवीची मूर्ती असून तिचे नाव भुयारी देवी आहे. येथून पुन्हा फिरुन दरवाजाकडे यावे लागते. दाराजवळ म्हसोबा मंदिर आहे. येथून दरवाजाची बांधणी दिसते. पायऱ्यांच्या बाजूला संरक्षक भिंत बांधून दरवाजाची सुरक्षितता वाढवली आहे. पायऱ्यांच्या वर दोन्ही बाजूंना भक्कम बुरुज बांधून आतल्या बाजूला दरवाजा घेऊन दोन्ही बुरुजांच्या कह्यात तो ठेवला आहे. वळणदार मार्गावरच्या या दरवाजावर खालून तोफांचा मारा करणे अशक्य होते.

दरवाजाची कमान पडलेली आहे. येथून पुढे गेल्यावर सरळ वाट पश्चिम कड्यावर जाते. तर डावीकडील वाट माथ्याकडे जाते. भूषणगडाचा एकूणच विस्तार लहान आहे. माथा चारही अंगाने तटबंदीने सुरक्षित केलेला असून जागोजागी पहाऱ्यासाठी बुरुज बांधले आहेत. गडावर सुशोभिकरणासाठी लावलेल्या झुडूपांनी आता तटबंदी व घरांची जोती आच्छादली गेली आहेत. भूषणगडाचा आकार साधारण त्रिकोणी आहे. या तिन्ही टोकावर टेहळणीसाठी बुरुज आहेत. या तिन्ही टोकांच्या मध्यभागी उंचवटा असून त्यावर हरणाई मातेचे मंदिर आहे. पूर्वी हे मंदिर जमिनीच्या पातळीखाली होते. ते आता उचलून पातळीवर नव्याने बांधले आहे. मंदिरासमोर दीपमाळ आहे. मंदिराच्या बाजूलाच धर्मशाळा असून मुक्काम करणाऱ्यांची सोय होऊ शकते.

भूषणगडाला लागून एकही डोंगर नाही त्यामुळे गडावरुन चारही बाजूला दूरपर्यंत शत्रूवर नजर ठेवणे शक्य होते. येथून औंधची यमाई, महिमानगड, शिखर शिंगणापूर ही दृष्टीस पडतात.

गडावर पाण्याचा अभावच आहे. पूर्व बाजूच्या कड्याच्या पोटात म्हणजे भूषणगडाच्या अर्ध्या डोंगरातील एका कपारीत पाण्याचे टाके आहे. तेथून पंपाने पाणी वर ओढून पुरवठा केला जातो.

❑❑❑


हरणाई देवी मंदिर



# जयप्रकाश जोशी

नाशिकजवळ सय्यद-पिंप्री गावातील गरीब कुटुंबात जन्मलेल्या जयप्रकाश जोशी यांनी अकरावीपर्यंत शिक्षण घेतले. स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी कामाच्या शोधात ते नाशिकला आले. तो काळ १९७१-७२ चा. आज जोशी यांची यशोगाथा ग्राइंडिंग व्हिल्सच्या निर्मितीच्या चाकावर जगभर वेगाने दौडत आहे.

जोशी सत्तरीच्या दशकात नाशकात आले, तेव्हा त्यांना गॅरेजमध्ये संधी मिळाली पण महिन्याकाठी अकरा रुपयांच्या बोलीवर. तिथे राबल्यानंतरही पदरी फार पडत नसल्याने तीन वर्षांनी त्यांनी मायको कंपनीच्या एका डिलरकडे नोकरी धरली. वर्षभर त्याच्याकडे काम केल्यानंतर त्यांना केंद्र सरकारची संस्था असलेल्या इंडियन सिक्युरिटी प्रेसमध्ये कामगार म्हणून संधी मिळाली. नाशिकरोडच्या या प्रेसमध्ये काम करताना तोच साचेबध्दपणा, कामाची ठराविक चौकट आणि कलागुणांना वावही मिळत नाही, याची त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली. चांगला पगार असतानाही स्वत:ला घडविण्याच्या हेतून जोशी यांनी प्रेसला १९९५ मध्ये रामराम केला. त्यानंतर त्यांनी ग्राईंडिंग व्हिल्सबाबत जुजबी माहिती घेतली व त्याचे प्रशिक्षण घेतले. आत्मविश्वासाच्या बळावर त्यांनी अंबड एमआयडीसीत २०० चौरस फूट जागेत ग्राईंडिंग व्हिल्सचे उत्पादन सुरु केले. मोठ्या धडपडीनंतर त्यांनी अंबडमध्ये नाईसच्या गाळ्यामध्ये १९९५ साली उद्योग सुरु केला. पण, ग्राईंडिंग व्हिल्सला लागणारी अचूकता साधता येत नव्हती. त्यासाठीचे तंत्रज्ञानही मिळत नव्हते. अखेर जर्मनी, फ्रान्स, इटली या देशांमधील उद्योगांना तसेच प्रदर्शनांना भेटी देऊन त्यांनी अचूक निर्मितीची प्रक्रिया समजावून घेतली. त्यानुसार, नाशिकमध्ये यासाठीचे तंत्रज्ञान विकसित केले. त्यातून ऑटोमोबाईल व बेअरिंग उद्योगाला लागणारी सिरॅमिकची ग्राईंडिंग व्हिल्स तयार करण्यास त्यांनी सुरुवात केली. चांगल्या गुणवत्तेमुळे मागणी वाढली. मग सातपूर एमआयडीसीत त्यांनी उद्योग विस्तारला. पाहता पाहता भारतासह परदेशात या व्हिल्सनी शिरकाव केला. त्यासाठी सतत परदेशदौरे, तेथील कंपन्यांशी बातचीत व त्यांच्या अपेक्षेनुरुप उत्पादन असे चक्र सुरु झाले. यातून त्यांची जोटो अब्रेसिव्ह ही कंपनी तब्बल १२ देशांमध्ये सिरॅमिक ग्राईंडिंग व्हील्सची निर्यात करु लागली. भारतात चिनी पदार्थांची रेलचेल असताना चीनसह अनेक देशांत जोशी यांच्या ग्राईंडिंग व्हील्सनी दबदबा निर्माण केला. त्यांच्या उद्योगातून वर्षाकाठी लाखो डॉलर्सचे परकीय चलन भारताला मिळते. जिथे महिन्याकाठी दहा-वीस हजार रुपयांचा व्यवहार व्हायचा. तिथे आता ५० लाख रुपयांची उलाढाल होते. त्यामुळेच, दररोज १५ हजार रुपयांचा प्राप्तीकर देणारा जोशी यांचा महाराष्ट्रातील पहिलाच हा लघुउद्योग ठरला.

❏❏❏

# पोटात गॅस झाला आहे का?

**हल्ली कॉम्प्युटर युगात गुंतलेल्या व्यक्ती टेंशन, चुकीचे खाणे, पिणे व राहणीमान यामुळे पोटातील गॅसची शिकार होत आहेत. हा रोग इतर अनेक भयानक आजारही वाढवण्यास मदत करतो! खालीलपैकी कुठलाही उपाय जो शक्य असेल तो अवश्य करावा.**

☞ रुग्णांनी सकळी उठताच चूळ भरुन नंतर एक लिंबाचा रस, अर्धा चमचा लसूण रस, ग्लासभर ताज्या पाण्यात मिसळून रोज प्यावा.

☞ नाश्त्यात मोडाची धान्ये, डाळी, ताजी मोसमी फळे व दिवसातून एक दोन वेळा भाज्यांचे सूप व ताज्या फळांचा रस, दह्याची खारी पातळ लस्सी घ्यावी.

☞ जेवणात कोंडायुक्त पिठाची भाकरी, पालक, दुधी भोपळा, तोंडली, पडवळ व सॅलेडमध्ये काकडी, टोमॅटो, कोबी इ. घ्यावे.

☞ जेवताना व्हिनेगर-मीठयुक्त सोललेले लसूण व आले खावे, तसेच मांसाहारी पदार्थ, मिठाई, अल्कोहोल, मटार, पावटा, राजमा, तांदूळ इ. कमी खावे.

☞ वृध्दांनी हिंगाष्टक चूर्ण एक लहान चमचाभर जेवणाच्या अर्धा तास अगोदर ताज्या पाण्यातून सतत घ्यावे.

☞ जेवणानंतर लगेच झोपी जाऊ नये. काही वेळ फिरुन यावे.

☞ जेवणानंतर पंधरा मिनिटांनी एका कागदी लिंबाच्या रसात एक-दोन ग्रॅम मिरपूड व काळे मीठ ग्लासभर पाण्यात मिसळून घ्यावे.

☞ एकूण भुकेच्या तीन चतुर्थांश जेवण केल्यास गॅस होत नाही.

☞ सूर्यकिरणात ठेवलेले पाणी गरम झाल्यानंतर हळूहळू प्या. ही क्रिया नियमित करावी.

☞ आठवड्यातून एकदा उपवास करावा व त्या दिवशी फक्त लिंबू ग्लुकोजयुक्त पाणी प्यावे.

☞ बाजारातील जड, चटकदार खाद्य, पेय व पदार्थ खाऊ नयेत.

☞ हिंग पाण्यात वाटून त्याचा नाभीभोवती लेप करावा.

☞ सुंठ व ओव्याचे चूर्ण आठ-आठ ग्रॅम चिमूटभर काळे मीठ, कपभर गरम पाण्यात मिसळून सकाळ-संध्याकाळ प्यावे.


☞ मीरड, पिंपळी चूर्ण व काळे मीठ समप्रमाणात मिसळून रोज ६ ग्रॅम ताज्या दह्यासोबत खावे.

❑❑❑

# आसन : भू-नमन-वज्रासन

हे आसन म्हणजे वज्रसनाचा एक प्रकार आहे. मात्र सुप्त वज्रासनाच्या उलट दिशेला हे आसन केले जाते. कित्येक लोक या आसनास योगमुद्रेचा एक प्रकार समजतात.

**कृती :** वज्रासनात आसनस्थ व्हा. नंतर हळूहळू पुढे वाका. वाकत असताना चित्रात दाखविल्याप्रमाणे हात मागे न्या आणि उजव्या हाताच्या पंजाने डाव्या हाताच्या कोपराखाली पकडा व डाव्या हाताच्या पंजाने उजव्या हाताच्या कोपराखाली पकडा. त्यानंतर नाकपुड्यांद्वारा फुफ्फुसात श्वास रोखा. आता हा रोखलेला श्वास हळूहळू सोडत मान लांब करुन नाकाने जमिनीला स्पर्श करा. या ठिकाणी हे आसन पूर्ण होते. हे आसन सुरुवातीस काही दिवस अत्यंत थोडा वेळ करावे. हळूहळू वेळ वाढवित दहा सेकंदांपर्यंत या आसनस्थितीत राहावे.



**फायदे :**

- या आसनाच्या नित्य सरावामुळे जठर सुदृढ बनते.
- यकृतातील विकृती दूर होते आणि स्वादुपिंडातील शिथिलता नाहीशी होऊन ते सक्रीय बनते. सर्व स्नायू बळकट होतात.
- बध्दकोष्ठता नाहीशी करण्यासाठी हे आसन म्हणजे एक अमोघ साधन आहे.
- या आसनामुळे मधुमेह, उदरोग, सर्दी, वातविकार, अग्निमांद्य, स्वप्नदोष, निद्रानाश, दमा, मुरडा आणि अजिर्णासारखे रोग दूर होतात.
- या आसनाच्या नियमित सरावाने जठराग्नी प्रदीप्त होतो.

# वाढदिवसाच्या



ईशा हिंडे


नक्ष सस्कर


ध्रुवी बारी


सार्थक तरळ


प्रिया शिंदे


श्लोक भोजने


प्रतिक च्यारी


नेत्रा शिंदे


प्रेम भिसे


प्रितिका सुकुम


आराध्या सुर्वे


दिपीका चांगण


वेदान व वेदिका सोनुने


# हार्दिक शुभेच्छा


धनश्री शिंदे


कौस्तुभ पाटील


सुदिक्षा बजबळे


स्वरा खुसपे



तन्वी बाबर


अश्विन चाळके


आरोही कोळी



अजिंक्य मोरे


सिमरण


वंदिता परब


विराज भोसले


सेजल महाडिक


वेदांगी


प्रांजल भोईर

# वैज्ञानिक प्रश्नोत्तरे

**प्रश्न : मेणबत्ती जळताना तिचे मेण कुठे जाते ?**

**उत्तर :** कोळसा किंवा तेल जळताना सामान्य माणसाला असे वाटते, की हे पदार्थ प्रक्रियेत नाहीसे झाले. जळत्या मेणबत्तीच्या संदर्भात असाच विचार केला जातो. परंतु खरे पाहता हे पदार्थ नाहीसे होत नाहीत. त्यांची रुपे फक्त बदलतात. ज्वलन हा रासायनिक बदल आहे. तो ऑक्सिजनच्या अस्तित्वामुळे घडून येतो. या प्रक्रियेत वस्तू निर्माणही होत नाही वा नष्टही होत नाही. तिचे केवळ रुपच बदलते. वस्तूच्या अविनाशित्वाचा नियम म्हणून तो परिचित आहे.

जेव्हा मेणबत्ती जळते तेव्हा मेणाचे केवळ अन्य पदार्थात रुपांतर होते. ज्या क्षणी आपण मेणबत्तीची वात पेटवितो त्याचक्षणी उष्णतेमुळे मेण वितळू लागते. वितळलेले मेण पृष्ठीय ताणामुळे वातीपर्यंत वर जाते. पृष्ठीय ताण हा द्रवाचा गुणधर्म आहे. याच गुणधर्मामुळे टीपकागद शाई शोषून घेतो. या द्रवरुप मेणाचे वायूत रुपांतर होते. हा वायू जळू लागतो आणि त्यातून उष्णता, प्रकाश यांची निर्मिती होते.

मेण हे जटील हायड्रोकार्बन असून त्यात हायड्रोजन आणि कार्बन समाविष्ट आहेत. ज्वलन प्रक्रियेत कार्बन हवेतील ऑक्सिजनशी संयोजित होऊन कार्बनडाय ऑक्साईड वायू तयार होतो. मेणातील हायड्रोजन हवेतील ऑक्सिजनशी संयोजित होऊन पाण्याची वाफ तयार होते. या दोन प्रक्रियेत मेणाचा व्यय होतो आणि मेणबत्तीचा आकार कमी कमी होतो.

**प्रश्न : मातीच्या भांड्यात पाणी थंड का राहते ?**

**उत्तर :** उन्हाळ्यात आपण मातीच्या मठातील वा रांजणातील थंडगार पाणी पितो. पण मातीच्या भांड्यात ठेवलेले पाणी काही वेळातच गार कसे होते हे माहीत आहे का? याचे कारण आहे बाष्पीभवनाची प्रक्रिया.

जेव्हा एखाद्या द्रवपदार्थाचे बाष्पीभवन होते तेव्हा त्याचे तापमान कमी होते. कारण बाष्पीभवनाला हवी असणारी उष्णता द्रवपदार्थातूनच मिळते. अशी उष्णता घटल्यामुळेच द्रवपदार्थाचे तापमान कमी होते. मातीच्या भांड्याला असंख्य सूक्ष्म छिद्रे असतात. जी फक्त डोळ्यांनी दिसत नाहीत. जेव्हा भांड्यात पाणी भरले जाते तेव्हा या सूक्ष्म छिद्रांवाटे भांड्याच्या बाह्यपृष्ठभागावर येते व त्याचे बाष्पीभवन होते व त्यामुळे भांड्यातील पाण्याचे तापमान कमी होते व पाणी थंड होते. जर हेच पाणी धातूच्या वा काचेच्या भांड्यात ठेवले तर त्यांना छिद्र नसल्यामुळे बाष्पीभवनाची क्रिया घडत नाही व पाणी थंड होत नाही. याप्रमाणे उन्हाळ्यात आपण पंख्याखाली उभे राहिल्यानंतर आपल्याला थंडावा जाणवतो तेव्हा आपल्या त्वचेच्या सूक्ष्म छिद्रावाटे बाहेर पडणाऱ्या घामाचे बाष्पीभवन होत असते.

कविता : प्रणय राजेश बनगडे

# बाल सेवादल

आम्हा बालकांची माता सद्‌गुरु सविंदर महान
आम्हा बालकांचे सदा करीत असे कल्याण ।।धृ।।

चरणी घेतले आम्हा बाल सेवादार
घडवी मानवतेचे आम्हावरी संस्कार
ही उपकाराची खाण ।।१।।

पांढरे शर्ट टोपी पँट शोभते खाकी
बूट पांढरे सॉक्स नीळे वर्दी अशी आमुची
हे सद्‌गुरुचे वरदान ।।२।।

चिमुकल्या हातांनी करवून घ्यावी सेवा
जीवनभर आनंदाने खाऊ सुखाचा मेवा
सकळांचा करु सन्मान ।।३।।

मानवतेच्या गुणानी सदा प्रणय असावे नेक
शून्य अशा या जीवनासंगे जोडून राहो एक
जीवनाची असे ही शान ।।४।।



# प्रेम जीवनाचे अमृत आहे



प्रेम जीवनाचे अमृत आहे. वैर-विरोधाची संपूर्ण गाथा तर लोक आठवून आठवून सांगतात, परंतु प्रेमाची अडीच अक्षरं आठवणीत राहात नाहीत. मनुष्य प्रेमाची भाषा शिकला तर मग वैर-विरोधाचा कोणताच भाव राहणार नाही. प्रेम आहे तर जीवन आहे अन्यथा जीवनालाही काही अर्थ नाही. प्रेम आणि मिलनसारतेचा भाव संपूर्ण विश्वामध्ये निर्माण व्हायला हवा. आपण नेहमी प्रेम वाढवायचे आहे, वैर-विरोध नाही. जसं शरीराला सजवण्यासाठी दागिने परिधान केले जातात त्याचप्रमाणे जीवनाला सजविण्यासाठी प्रेम, दया, करुणा आणि सत्काराचे दागिने परिधान करावे लागतील. प्रेम, नम्रता, सहजता आणि विशालता रुपी गुणांनी भक्तजनांचे जीवन सुशोभित रहावे. हे गुणच भक्तांची ओळख आहे. जे क्षणोक्षणी कमी होते, वाढते ते प्रेम नसते. प्रेम, नम्रता गुरसिखाची निशाणी आहे. प्रेम वाटण्याची वस्तू आहे. प्रेमाने युक्त राहून सर्वांशी प्रेम करावे आणि प्रेमाचे विश्व निर्माण करावे.

जर जगाचे एक सुंदर रुप पाहू इच्छिता, धरतीवर स्वर्ग अवतरला आहे असे पाहू इच्छिता तर त्यासाठी तशी पावलंही उचलावी लागतील, त्याशिवाय हे शक्य नाही. ती पावलं आहेत एका सत्याशी नाते जोडण्याच्या रुपात, याचा बोध प्राप्त करण्याच्या रुपात. मग अशाप्रकारे एकतेच्या धाग्यामध्ये गुंफले जातील जिथे कोणी परका नसेल, कोणी दूजा नसेल, कोणतीही श्रेष्ठ व कनिष्ठतेची भिंत नसेल.

**- बाबा हरदेवसिंहजी महाराज**

# थोडक्यात माहिती गुगलची

गुगल कंपनी १९९८ मध्ये स्थापन झाली. स्थापन झाल्यापासून आत्तापर्यंतच्या सर्वेक्षणामध्ये ती जगातील अति बलाढ्य कंपनीमधील एक बनली आहे. इंटरनेटचा वापर करणाऱ्या सर्वांना हे परिचीत आहे. दररोज ६२ कोटी लोक या गुगलचा वापर करतात.


गुगलचे सुरुवातीचे नाव लेकरल. गुगलने आत्तापर्यंत १२७ कंपन्या आपल्या ताब्यात घेतल्या आहेत.

गुगलचे पहिले डुडल म्हणजे बर्निंग मॅन. १९९८ मध्ये गुगलचे संस्थापक लॅरी पेज आणि सर्जी ब्रिन बर्निंग मॅन एका फेस्टिवलला गेले होते. तेव्हा त्या आठवड्याच्या शेवटी ते ऑफिसमध्ये नाहीत हे गुगल वापरणाऱ्यांना कळावे यासाठी त्यांनी डुडल वापरले.

नोव्हेंबर १९९९ मध्ये जेव्हा गुगल कंपनीत ४० कामगार होते तेव्हाच तेथे एक कुकही ठेवण्यात आला. खाद्यपदार्थासाठी गुगलच्या कोणत्याही कर्मचाऱ्याला १०० फुटांपेक्षा लांब जावे लागत नाही. गुगल फ्लेक्समध्ये ठिकठिकाणी छोटी मोठी किचन आणि एस्प्रोसो मशिन्स आहेत. एकूण कामाच्या २० टक्के वेळ कामगार स्वत:ला आवडेल त्याप्रकारचे काम करण्यासाठी देऊ शकतात. अशाप्रकारची सूट दिल्यामुळेच गूगल न्यूज, ऑर्कूट यांसारख्या कंपन्या सुचून त्या प्रत्यक्षात आल्या. गुगलमध्ये सध्या ५४ हजार कामगार आहेत. गुगलमध्ये काम करण्यासाठी दरवर्षी १० लाख इच्छुकांचे अर्ज येतात. त्यापैकी फक्त ५००० लोकांची निवड करण्यात येते.

सध्या जीमेलचा वापर ५०हून अधिक भाषेत करता येतो. गुगल २००४ मध्ये पब्लिक लिमिटेड कंपनी झाली. त्यावेळी कंपनीचे १ हजार कामगार कोट्याधीश झाले होते.

गुगलचा वार्षिक महसूल सहा हजार कोटी डॉलर्स (रुपयांमध्ये ३ लाख ७८ हजार कोटी) आहे. जगातील सर्वात गरीब असलेल्या ४७ देशांमध्ये एकत्रित राष्ट्रीय उत्पन्नाइतका गुगलचा महसूल आहे.



# हसा मुलांनो हसा

बाळूकाका पहिल्यांदाच फाईव्ह स्टार हॉटेलात गेले. त्यांनी चहाची ऑर्डर दिली. वेटरने ट्रे मध्ये गरम पाणी, चहा बॅग, साखर, दूध आणून समोर ठेवले.
बाळूकाकांनी कसाबसा चहा बनवला. त्यांचा चहा पिऊन झाल्यावर वेटरने विचारले, "अजून काही घेणार का ?"
बाळूकाका म्हणाले, "कांदेभजी खायची होती, पण राहू दे. तू पुन्हा कढई, तेल, कांदे, बेसन आणून ठेवशील."

बाबुराव पहिल्यांदाच मुंबईच्या लोकल ट्रेनने प्रवास करत होते. बाहेर मुसळधार पाऊस पडत असल्याने गाड्या हळूहळू चालत होत्या. थोड्या वेळात गाडी थांबली. गाडी पुढे जाईना. गाडीत स्पीकरवर मोटरमनने सूचना दिली - भारी वर्षा के कारण ट्रेन आगे नही जा रही है। त्यावर बाबूराव वैतागत पत्नीला फोन करत म्हणाले, "अगं, गाडीत कोणीतरी भारी वजनाची वर्षा बसलीय त्यामुळे गाडी पुढं जात नाहीये अन् ड्रायव्हर तिला उतरवत पण नाही."

टीचर : रमेश १८६९ मध्ये कोणत्या थोर नेत्याचा जन्म झाला ?
रमेश : महात्मा गांधीजींचा !
टीचर : शाब्बास ! दीपक तू सांग १८७२ मध्ये काय झाले ?
दीपक : गांधीजी तीन वर्षांचे झाले.

शिक्षक : एका टोपलीत दहा आंबे होते. त्यातील तीन आंबे सडले तर टोपलीत किती आंबे राहिले ?
पिंकू : दहा आंबे.
शिक्षक : कसे काय ?
पिंकू : आंबे सडले तरी ते आंबेच राहणार ना ? त्यांची केळी थोडीच होणार ?

रमाबाई : माझी सून फार नम्र आणि सद्‌गुणी आहे बरं! अहो, लग्नमंडपात पूजेच्या सगळ्या विधी होईपर्यंत तिने मान वर करुन सुध्दा पाहिलं नाही.
पिंकी : अगं आई, ती वॉट्‌सपवर होती. नम्र वगैरे काही नाही हं!

पती : (जेवत असताना) काय गं, काय ही डाळ बनवली. अगदी पाण्यासारखी. काहीच चव नाही तिला. दिवसभर मोबाईल धरुन बसतेस.
पत्नी : आधी तुमच्या हातातला मोबाईल बाजूला ठेवा. कधीपासून पाहतेय, भाकरी डाळीत बुडवण्याऐवजी पाण्यात बुडवून खाताहेत.

आजोबा (नातवाला) - अरे, बघ रे त्या पोरीला फिट आलीय. मान, तोंड वाकडं झालंय. हात पण वर गेलाय. जा वाचव तिला...
नातू : अहो आजोबा! तिला फिट नाही आलीय. ती सेल्फी काढतेय.

मॅट्रिक झालेली मंगी खेडेगावातल्या आपल्या नवऱ्याबरोबर बाजारात गेली.
नवरा : भय्या, संत्री कशी दिली ?
मंगी : तुम्ही बाजूला व्हा. मी बरोब्बर भाव करते बघा.
दुकानदार : १०० रुपयांना दहा.
मंगी : काहीतरी कमी करा की.
दुकानदार : ठीक आहे ८० रुपयाला आठ घ्या.
मंगी : थँक यू सो मच भय्या!

बन्या : बाबा, पॉपकॉर्न कढईत उड्या का मारत आहेत ?
बाबा : तू बसून बघ म्हणजे तुला कळेल!

# दत्तात्रेयांचे दर्शन

समर्थांची स्वारी फिरत-फिरत मातापुरास गेली. तेथे दत्तात्रेयाचे मंदिर आहे. तेथे दहा ब्राह्मण अनुष्ठानास बसले होते. त्यांना नमस्कार करत समर्थांनी विचारले, "आपण येथे अनुष्ठान का करत आहात?" त्यावर ब्राह्मण म्हणाले, "दत्तात्रेयांनी आम्हाला दर्शन द्यावे म्हणून आम्ही बसलो आहोत." समर्थ म्हणाले, "मी ही बसतो. दत्तात्रेयांचे दर्शन घेऊनच जातो." ब्राह्मण मोठ्याने हसू लागले. ते म्हणाले, "आम्ही बारा वर्षांपासून इथे बसत आहोत, आम्हाला अजून दर्शनाचा ठावठिकाणा नाही, आणि हे घटकाभर बसून दर्शन घेऊन जाणार?"

समर्थ तेथे बसलेले पाहून दत्तात्रेयांची स्वारी मलंग फकिराचा वेष घेऊन प्रकट झाली. एक पत्नी, तीन मुले, सहा बकऱ्या, पंचवीस कोंबड्या, एक रेडा इ. साहित्यानिशी ते तेथे आले आणि पत्नीला म्हणाले, "इधर जगह अच्छी है, हंडी पकाव."

पत्नीने तीन दगड मांडून चूल पेटवली. मोठे गाडगे त्यावर ठेवून त्यात पाणी ओतले आणि विचारले, "अब इस में क्या डालना है?" फकिर म्हणाला, "मुरगीयाँ काटकर डालो." त्या बाईने सुरा घेतला आणि भराभर सगळ्या कोंबड्याच्या माना कापून त्या गाडग्यात घातल्या आणि पुन्हा येऊन विचारले, "हजरत, हंडी भरी नही, अब क्या डालना है?" फकिर म्हणाला, "बकरीयां काट डालो." सहा बकऱ्या कापून त्यात टाकल्या तरी हंडी भरेना मग त्यांनी रेडा कापून टाकायला सांगितले. तरीही हंडी भरेना. मग फकिर ब्राह्मणांकडे पाहत म्हणाला, "अब ये सारे बम्मन काट कर हंडी में डालो."

ती बाई ब्राह्मणांकडे सुरा घेऊन येताच अनुष्ठानास बसलेले सारे ब्राह्मण पळत सुटले. आणि लांब जाऊन झाडाआड लपून पाहू लागले. समर्थ कल्याणस्वामींसह तेथेच बसलेले होते. ती सुरा घेऊन त्यांच्याकडे आली आणि समर्थांनी आपली मान पुढे केली. कल्याणस्वामींनीही आपली मान पुढे केली. ते पाहून दत्तात्रेयांनी आपले मूळ स्वरुप प्रकट केले आणि ते समर्थांना कडकडून भेटले व जगाच्या उध्दाराचे कार्य पुढे चालू ठेवावे असा आशीर्वाद दिला.

समर्थांनी दत्तात्रेयांना विनंती केली, बारा वर्षांपासून ब्राह्मण अनुष्ठान करताहेत. त्यांना दर्शन द्यावे. त्यावर दत्तात्रेय म्हणाले, ते वाममार्गी आहेत तरीपण मी तुमच्या विनंतीला मान देतो.

❍ क्रमशः

कविता - महेंद्र पाटील (सफाळे)

# कधी रे येशील फुलून अंगणी

छंद तुझा मला मी विसरु कसा
ओढ लावी जीवा जीव वेडा-पिसा

पर्णगुच्छ दिसे शोभुनी
परिधानलेला शालू पैठणी
रंगीन लाली ओठी लेवुनी
दृष्टी पडता जावे मोहुनी

सुमन गोजिरे धुंद व्हावे
मधुर गंधात न्हाऊन जावे
वाऱ्यासंगे तू डोलावे
क्षणी मनाला तू भुलवावे


नाना सुमने निसर्गात जरी
प्रेम प्रतिकाचा तूच मानकरी
याद तुझी ती गहरी न्यारी
फुले पाहता चित्त विदारी

त्या फूल वेली पाहतो नयनी
साद घालिती त्या आठवणी
कधी रे येशील फुलून अंगणी
का रुसलासी एकदा उमलुनी



# किट्टी

चित्रांकन व लेखन : अजय कालडा








तू करणार तयारी ?
अरे सोडा, तुम्ही काळजी करु नका. मी सर्व तयारी करते.
ही पहा मी दिव्यांची तोरणं आणलेली आहेत. तुम्ही फक्त उभे राहून पहा.
आता तुम्ही पहा आपलं गार्डन कसं झगमगेल ते !


धडाम!
अरे! अरे! मी तर पडले.
काही चिंता नको, सर्व तयारी झाली आहे.
चला, चला, आपण सारे आता थोडा खेळ खेळूया.
किट्टी, तू आज इतकं सर्व काम कसं काय केलंस?
मी आजपर्यंत सर्वांनाच त्रास दिला आहे; परंतु आज शानूच्या बर्थडेच्या निमित्ताने मी प्रण केला आहे, की यापुढे मी कोणालाच त्रास देणार नाही.


चला, चला, सात वाजले आपण सर्व मिळून प्रथम केक कापूया.
मित्रांनो, पहा किट्टी आता फार बदलून गेली आहे ना! सजावट देखील तिने फारच सुंदर केलेली आहे. आपण देखील तिला एक उपहार देऊया!
हो हो! तू बरोबर बोललास.
किट्टी, बघ तुझ्यासाठी काय आणलं आहे.
वा! वा! फारच छान शानू, मोंटू, चिंटू, बबलू तुम्ही सर्व किती चांगले आहात. शानूचा हा वाढदिवस माझ्या नेहमी लक्षात राहील.







वाढदिवसाची हाक गेली दूर सागरावरती
अन् आज किनारी आली शुभेच्छांची भरती














शिखरे उत्कर्षाची सर तुम्ही करत राहावी
कधी वळून पाहता आमची शुभेच्छा स्मरावी





कथा

# देव थोर म्हणावा की गुरु थोर म्हणावा

गुरुकुलात सर्व शिष्य दासबोधाचे श्लोक पाठ करत व गुरुजींना आपण पाठ केलेले श्लोक म्हणून दाखवत असत. एकदा माधवने गुरुजींना विचारले, "गुरुजी, या विश्वात देवाहून श्रेष्ठ कुणीही नाही; मग समर्थांनी **देवाहूनि गुरु थोर** असं का म्हटलं आहे. ?"

माधवच्या प्रश्नाला उत्तर देताना गुरुजी म्हणाले, "बाळ! समर्थांनी योग्य तेच सांगितलय. गुरुला देवापेक्षा श्रेष्ठ म्हटलं गेलं आहे. बैस इथं, मी तुला एक गोष्ट सांगतो" -

एक वाटसरु होता. तो पायीच प्रवास करत होता. चालता-चालता त्याला मोठ्ठं वाळवंट लागलं, वाळवंटातून चालणं फारच अवघड. त्यातून सूर्य आग ओतू लागला. सर्वांग घामानं भिजून गेलं. घशाला कोरड पडली. त्याच्याजवळ असलेलं पाणीही संपलं होतं.

पाण्याच्या आशेनं तो पाय ओढत कसाबसा चालला होता. पण त्याला कुठेही पाणी मिळाले नाही. शेवटी दूरवर त्याला एक विहीर दिसली. विहिरीजवळ दोर आणि बादलीही दिसत होती. त्याला आनंद झाला. पण अचानक भोवळ येऊन तो खाली कोसळला. डोळ्यापुढे अंधारी येऊ लागली. पाणी जवळ असूनही तो पिऊ शकत नव्हता. आता पाण्यावाचून आपण मरणार हे त्याला कळून चुकलं. तेवढ्यात एक सज्जन गृहस्थ तिथं आला. त्याने विहिरीतून पाणी काढलं. पाण्याची बादली घेऊन त्या वाटसरूच्या जवळ गेला आणि त्याला पाणी पाजलं. अशाप्रकारे वाटसरुचे प्राण त्याने वाचवले.

आता मला सांग, इथं वाटसरुचे प्राण कोणी वाचवले ?

पाण्याने की पाणी पाजणाऱ्या सज्जनाने ?........ अर्थातच पाणी पाजणाऱ्या सज्जनाने. कारण पाणी तर जवळ होतेच; पण तिथे आवश्यकता होती, पाणी पाजणाऱ्याची. तसं देव तर सर्वत्र आहेच; पण आवश्यकता आहे देवाला जाणणाऱ्या आणि देवाची भेट घडवून देणाऱ्या सज्जनाची! त्या वाटसरुसारखे आपणही देवाच्या भेटीसाठी वणवण भटकतो आणि थकून जातो. देव जवळ असूनही भेटत नाही; कारण देवाची भेट घडवून देणाराच कुणी नसतो. म्हणून देवाची भेट घडवून देणाऱ्याला म्हणजे गुरुला श्रेष्ठ म्हटलं आहे. गुरुला दया येते, गुरु आपली जात-पात, धर्म, भाषा, पाप-पुण्य काहीही न पाहता केवळ आपली तळमळ पाहून क्षणार्धात आपली देवाशी भेट घडवून देतो, म्हणूनच समर्थांनी म्हटलंय -

देव थोर म्हणावा की गुरु थोर म्हणावा।
आधी नमस्कार कोणाशी करावा।

समर्थावाटे देवाहुनि गुरु थोर। जयाचे कृपेने
भेटे। रघुराजवीर।।

गुरुजींनी दिलेले उत्तर ऐकून माधवसह सारे शिष्य संतुष्ट झाले.

❒❒❒

## थोडक्यात पोस्ट तिकिटांचा इतिहास

❒ पोस्टाच्या तिकिटांची कल्पना सर्वप्रथम इंग्लंडच्या जेस चामर्स व रोलेट हिल यांच्या डोक्यात आली.

❒ इंग्लंडमध्ये इ.स.१६८० मध्ये पोस्टाच्या तिकिटांचा प्रारंभ झाला.

❒ विल्यम डाकरा नावाच्या माणसाने सर्वप्रथम खासगी डाकसेवा सुरु केली.

❒ इ.स. १८४० ला लंडनमध्ये चिकटावयाच्या पोस्टाच्या तिकिटांचे मुद्रण करण्यात आले.

❒ सुरुवातीला पोस्टाची तिकिटे काळ्या व निळ्या रंगात छापत असत.

❒ इ.स.१८४१ मध्ये लाल रंगाच्या पोस्टाच्या तिकिटाचे प्रकाशन सुरु झाले. कारण काळ्या तिकिटांवर शिक्का व्यवस्थित दिसून येत नसे. त्यामुळे ती पुन्हा वापरली जात.

❒ पोस्टाच्या तिकिटांच्या संग्रहाच्या छंदाची सुरुवातही इंग्लंडमध्येच झाली.

❒ इ.स. १८६५ मध्ये पोस्टाच्या तिकिटांच्या संग्रहाच्या छंदाला फिलेटेली असे नाव देण्यात आले.

❒ सदोष पोस्टाची तिकिटे दुर्मिळ असतात. त्यामुळे यांची किंमत खूपच जास्त असते.

❒ भारतात पहिले पोस्टाचे तिकिट इ.स.१८५२ मध्ये कराची येथे जारी करण्यात आले. जे फक्त सिंधमध्येच लागू होते.

❒ भारतीय डाक विभाग इ.स.१९३१ सालापासून प्रख्यात व्यक्तींना सन्मानित करण्यासाठी व महत्त्वाच्या घटनांप्रित्यर्थ पोस्टाची तिकिटे सुरु करीत आहे.

❒❒❒

# जालना

**मुख्यालय :** जालना

**तालुके :** जालना, अंबड, भोकरदन, धनसावंगी, परतूर, बदनापूर, मंठा, जाफराबाद

**नद्या :** गोदावरी, दुधना, कल्याण, कुंडलिका, पूर्णा, खेळणा, गिरजा, जीवरेखा, जुई

**खनिजे :** बांधकामासाठी लागणारा दगड व नदीकाठची रेती.

**प्रमुख शेतकी उत्पादने :** मुख्य पीक ज्वारी, कापूस, ऊस, तूर, मुग, मका, बाजरी, भुईमूग, कडधान्ये, द्राक्षे, केळी, मोसंबी

## विशेष माहिती :

१ मे १९८१ रोजी औरंगाबाद जिल्ह्याचे विभाजन करण्यात येऊन जालना हा नवीन जिल्हा निर्माण केला गेला.

जालना जिल्ह्यातील धनसावंगी तालुक्यात जांब या गावी समर्थ रामदास स्वामी यांचा जन्म झाला.

संकरित बियाणे उद्योगामध्ये जालन्याचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतले जात आहे. महाराष्ट्र हायब्रीड सीड्स कंपनीने (महिकी) या बियाणे उत्पादक कारखान्यांना वेळोवेळी नवनवीन बियाण्यांचे संशोधन करुन दिले आहे.

भारताने अंतराळात सोडलेल्या उपग्रहांशी सातत्याने संपर्क ठेवणे सोयीचे ठरावे, ते जास्तीत जास्त सुकर व्हावे, अचूक व्हावे, अत्यंत महत्त्वाच्या कार्यात कोणताही अडथळा येऊ नये आणि यासारख्या अनेक तांत्रिक, भौगोलिक आणि शास्त्रीय दृष्टिकोनामुळे केंद्रिय दळणवळण मंत्रालयाने जालना शहराजवळ उपग्रह अनुश्रवण भूकेंद्र उभारले आहे.

जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात मत्स्योदरी देवी व खंडोबाची मंदिरे प्रेक्षणीय आहेत.

जालना जिल्ह्यामध्ये लगान, भिल्ल, पारधी व कैकाडी इ. जमाती आढळतात.


मत्स्योदरी देवी मंदीर


गणेश भुवन

# परीक्षा जवळ येत आहे

परीक्षा आता जवळ येत आहे. मुलांनो, त्यासाठी आपणाला आत्तापासूनच तयारीत राहणे आवश्यक आहे. झालेल्या अभ्यासाची उजळणी आत्तापासून करायला घेतली तर परीक्षेच्या वेळी निर्धास्त राहू शकता. उद्या परीक्षा आहे म्हणून तुम्ही आज अभ्यासाची तयारी करुन परीक्षेला बसणार असे कधीही गृहीत धरु नका. त्यामुळे प्रश्नपत्रिका हातात आल्याबरोबर तुमच्या डोक्यात उत्तरांचे काहूर निर्माण होईल आणि त्यामुळे जे येत असते ते सुध्दा डोक्यातून निघून जाईल म्हणून हा सावधानतेचा इशारा समजा.

## परीक्षेच्यावेळी मातापित्यांनी घ्यावयाची भूमिका

मुलांप्रमाणेच माता पित्यांनाही आपल्या मुलांनी चांगले गुण मिळवून पास व्हावे अशी अपेक्षा असते आणि असावी देखील. परंतु.......

❒ पालकांनी शाळेच्या पहिल्या दिवसापासूनच मुलाच्या रोजच्या अभ्यासाची चौकशी करुन त्याला रोजचा अभ्यास रोज पूर्ण करण्याची सवय लावावी.

❒ अभ्यासाचे वेळापत्रक तयार करा; त्याप्रमाणे अभ्यास करायची सवय लावा.

❒ दररोज थोडे प्रश्नोत्तराच्या निमित्ताने लिखाण करायला लावा; अक्षर सुधारेल व लक्षात राहील.

❒ अभ्यासाची वेळ ठरवून द्या. त्यांच्यावर जबरदस्ती करुन तासन् तास अभ्यासाला बसवू नका. कंटाळा आला म्हणजे त्याला फिरुन यायची सवलत द्या.

❒ रोज ठराविक वेळ खेळायला सोडा म्हणजे त्याची मानसिकता पुन्हा ताजी तवानी होऊन तो आनंदी राहील.

❒ परीक्षेच्या वेळी त्याचे मनोधैर्य वाढवा; तो हतबल होईल असे काही बोलू नका.

❒ तू अमुक इतके टक्के मार्क मिळवलेच पाहिजेत अशी अट किंवा शर्त त्याच्यापुढे ठेवू नका.

❒ परीक्षेच्या अगोदर आणि परीक्षेच्या वेळी मुलांना जागरण करायला लावू नका.

❒ पाठांतर किंवा घोकंपट्टीपेक्षा विषय भाग समजून घेणे अधिक चांगले. म्हणून केवळ पाठांतरावर भर देऊ नये.

❒❒❒

# सामान्य ज्ञान



१) जगाची यंत्रशाळा असे कोणत्या देशाला म्हटले जाते ?

अ) अमेरिका　ब) इंग्लंड　क) ग्रेट ब्रिटन　ड) न्यूयॉर्क

२) भारतातील सोन्याची सर्वात मोठी खाण कोणत्या राज्यात आहे ?

अ) म्हैसूर　ब) कर्नाटक　क) बिहार　ड) महाराष्ट्र

३) एडेस एजिप्ती या डासामुळे कोणत्या रोगाचा प्रसार होतो ?

अ) कॉलरा　ब) टी.बी.　क) डेंग्यू　ड) विषमज्वर

४) कुठल्या मोगल सम्राटाने लाल किल्ला बांधला ?

अ) औरंगजेब　ब) शहाजहान　क) हुमायून　ड) अकबर

५) कोणत्याही पिन क्रमांकामध्ये एकूण किती आकडे असतात ?

अ) आठ　ब) चार　क) दहा　ड) सहा

६) कधीही गुलाम न झालेला देश कोणता ?

अ) नेपाळ　ब) ओरिसा　क) ब्रह्मदेश　ड) हिमाचल प्रदेश

७) नेहरु स्टेडिअम कोठे आहे ?

अ) इंदौर　ब) जयपूर　क) मध्य प्रदेश　ड) पुणे

८) भाषिक तत्वावर निर्माण झालेले भारतातील पहिले राज्य कोणते ?

अ) आंध्रप्रदेश　ब) कोलकाता　क) बंगाल　ड) कर्नाटक

९) भारताने अलीकडेच उपग्रहांच्या प्रक्षेपणाचा कितवा टप्पा पूर्ण केला ?

अ) ५० वा　ब) ६० वा　क) १०० वा　ड) १२५ वा

१०) बाबा हरदेवसिंहजी यांनी लिहिलेला ग्रंथ कोणता ?

अ) गुरुदेव हरदेव　ब) हरदेव वाणी　क) अवतार वाणी　ड) दिव्य वाणी

उत्तरे इतरत्र

पक्षीजगत

# काळ्या-पांढऱ्या रंगसंगतीचा वकील



हा एक उंच काळ्या-पांढऱ्या रंगाचा करकोचा. त्याला कांडेसर, कोरव, पांढऱ्या मानेचा करकोचा असंही म्हटलं जातं. याला इंग्रजीत वुली नेक्ड स्टॉर्क किंवा व्हाईट नेक्ड स्टॉर्क असं म्हणतात. त्याच्या शरीराचा बहुतांश भाग पांढऱ्या रंगाचा असतो आणि केवळ पंख काळ्या रंगाचे असतात, यामुळेच या पक्ष्याला वकील असं म्हटलं जातं. हा स्थलांतरीत होणारा पक्षी असून भारतात राजस्थान व उत्तर प्रदेशात जास्त आढळतो. मूळ आशिया व आफ्रिकेत हा पक्षी दिसून येतो.

जवळपास ८५ सेंटीमीटर उंचीचा आणि काटकुळ्या पायांचा हा पक्षी साधारणच दिसतो. याच्या डोक्याचा भाग चमकदार काळा तर मानेचा व पोटाचा भाग पांढरा असतो. यामुळेच हा जणू काही काळा कोट घातला आहे व मानेला सफेद पट्टी बांधली आहे, अशा ऐटीत दिसतो. याची चोच व पाय तांबड्या रंगाचे असतात. लांब व अणकुचीदार चोचीमुळे उथळ पाण्यातून खाद्य शोधणं यांना शक्य होतं. हा शांत स्वभावाचा पक्षी एकलकोंड्या स्वभावाचा असतो. प्रजननाच्या काळात करकोचा जोडीदार भेटला, की एकमेकांच्या चोची घासत ते एकमेकांना अनुमोदन देतात.

हा जलचर पक्षी असून नदी, तलाव, दलदल अशा पाणथळ जागी हमखास आढळतो. नदीकाठी संथ गतीने फिरत अन्न शोधत चालणारा हा पक्षी करकोच्यासारखीच मान बाहेर सरळ रेषेत काढत उडतो. छोटे मासे, गोगलगायी, किडे, अळ्या, बेडूक, खेकडे आणि पाण्यातील कीटक हे यांचं मुख्य खाद्य आहे.

पाणथळ जागेलगत असलेल्या उंच झाडावर याची घरटी दिसून येतात. वाळलेल्या काटक्या, सुकलेलं गवत व काड्या यांचा वापर करुन ही घरटी बनवलेली असतात. या घरट्यात मादी शुभ्र पांढऱ्या रंगाची दोन ते पाच अंडी घालते. या पक्ष्यांची संख्या पुरेशी नसल्यामुळे त्याचं सर्वेक्षण, संवर्धन करणं गरजेचं आहे.

❒ संग्राहक : अंकित जाधव



कथा

# चोरावर मोर

वैभवनगरीमध्ये दयासागर नावाचा एक मोठा व्यापारी राहत होता. तो आजूबाजूच्या शहरात फिरुन त्यांना लागेल तो माल नेऊन देत असे. दयासागर नावाप्रमाणेच दयावान होता. आपल्या गावात सुध्दा सर्वांशी प्रेमाने आणि प्रामाणिकपणे वागत असे. व्यापारामधून कोणालाही फसवत नसे. त्यामुळे तो गावात सर्वांचा प्रिय होता. काही गरीब लोकांना तो वेळप्रसंगी मदतही करायचा.

एके दिवशी दयासागरच्या मनात आले. आपण जरा आणखी थोडे दूरच्या शहरात जाऊन थोडा व्यापार वाढवावा. असा विचार करुन तो एके दिवशी त्याच्या शहरापासून बरेच लांब असलेल्या शहरात पोहोचला. त्या शहराचे नाव होते चतुर नगरी. त्याने त्या शहरात जाऊन तिथे कोणत्या मालाला चांगला भाव मिळेल याचा अंदाज घेतला. त्याच्या अंदाजाप्रमाणे तिकडच्या लोकांना चंदनाची आवड आहे असे समजले.

काही दिवस गेल्यानंतर दयासागरने पाच गाड्या चंदन खरेदी केले आणि चतुर नगरीकडे निघाला. चतुर नगरीच्या व्यापाऱ्यांची एक मजबूत संघटना होती. ते सर्व एकविचाराने कोणाकडूनही माल स्वस्त दराने घेण्याचा प्रयत्न करीत असत.

दयासागर चंदनाची लाकडं घेऊन येणार असल्याची त्यांना कुणकुण लागली होती. यासाठी त्यांनी एक नामी युक्ती लढवली. त्यांनी काही लोकांना रस्त्यावर चंदनाच्या लाकडांची शेकोटी पेटवून शेक घेत बसवले. जिकडे तिकडे चंदनाचाच सुगंध येत होता. जिथे शेकोटी पेटवली होती दयासागर तिथे येऊन पोचला. गाडीवरुन खाली उतरला आणि त्या लोकांना म्हणाला, अरे तुम्ही तर चंदनाची लाकडं जाळत आहात. ते लोक म्हणाले, हो आमच्याकडे चंदनाची मोठमोठी जंगलं आहेत. मोठमोठ्या लाकडाच्या वखारी आहेत. आम्ही घरी जेवणसुध्दा चंदनाच्या लाकडावरच करतो.

दयासागरला एकंदरीत त्यांच्या बोलण्यातून शंका आली. दयासागर त्यांना काही न बोलता गाड्या घेऊन मुख्य बाजारपेठेत गेला. सर्व व्यापारी एक असल्यामुळे सगळ्यांचे उत्तर एकच होते. ते म्हणजे आमच्याकडे चंदन भरपूर आहे. त्यामुळे आम्हाला तुमच्या चंदनाची काही गरज नाही. सर्वांचे बोलणे एकच होते; परंतु सर्व व्यापारी मात्र दयासागरच्या गाड्यांसभोवती गराडा घालून उभे होते.

दयासागर हा मोठा धूर्त आणि मुरब्बी व्यापारी होता. त्याला व्यापाऱ्यांच्या बोलण्यावरुन कळले, की हे लोक चतुरनगरी नावाप्रमाणेच चतुर आहेत. यांना एकदम कमी किंमतीत चंदन हवे आहे.

दयासागरने आपल्या खिशातला मोबाईल काढला आणि मोठमोठ्याने बोलू लागला, हो, हो मीच आहे दयासागर. काय म्हणालात? तुम्हाला अर्जंट दहा गाड्या चंदन हवे आहे काय, पण माझ्याकडे आता फक्त पाचच गाड्या आहेत. चालतील का? पण एक ध्यानात ठेवा. तुम्ही अमुक एक भाव देत असाल तर मी पाच गाड्या तुमच्याकडे आता घेऊन येतो, बाकीच्या नंतर देईन. एवढे बोलून मोबाईल खिशात ठेवला आणि गाड्या वळवल्या.

व्यापारी आता खजील झाले आणि म्हणाले, शेटजी आता आमच्या नगरात आपण आला आहात मग त्याच भावाने आम्हाला हा माल द्या. आम्ही घेतो कारण आमच्या नगरीतून आपण असे नाराज होऊन जाणे योग्य नाही.

त्यावर दयासागर म्हणाला, मी आता हा माल दुसऱ्या व्यापाऱ्यांना द्यायचे नक्की केले. मग तुम्हाला कसा देणार. तेव्हा ते व्यापारी म्हणाले, त्याच्यापेक्षा आम्ही थोडी जास्त किंमत देतो पण हा माल आता आम्हालाच द्या. दयासागरने तो सर्व माल त्यांना विकला आणि अमाप पैसा घेऊन आपल्या घरी निघाला.

❏❏❏

गुरुमुख नेहमीच मनापासून दुसऱ्यांच्या गुणांची चर्चा करतात. जस जसे ते दुसऱ्यांना प्रकट करतात प्रभू-परमात्मा त्यांनाही प्रकट करत जातो, त्यांचेही यश होऊ लागते.

# चित्र काढा आणि रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१) क
२) ब
३) क
४) ब
५) ड
६) अ
७) ड
८) अ
९) क
१०) ब

## श ब्द को डे १६३

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ | र्जु | न | | फु | फ्फु | स |
| र्थ | | र्म | | ले | | का |
| | सु | दा | मा | | बा | ळ |
| | गं | | व | की | ल | |
| म | ध | मा | शी | | कां | |
| ल्या | | तृ | | मां | ड | वी |
| ळ | | भा | | ज | | स |
| म | हि | षा | सु | र | | |

।। तू ही निरंकार ।।

ना चिंता हो, ना भय हो...
केवळ "सद्‌गुरू माता सविंदर हरदेवजी महाराज" की जय हो....!



शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही...
एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची
खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

THE COMPLETE FAMILY SHOWROOM

मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते

सद्‌गुरू की निगाहे करम एक अगर पड जाये,
मुक्कदर फिरसे लिखने को खुदा मजबूर हो जाये...

सद्‌गुरू होता जग का दाता जो चाहे कर सकता है
पत्थर दिल भी गर पैरों को छुले भवसागर तर सकता है

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2016-2018
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2018
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month


।। तुही निरंकार ।।



जनार्दन एच्. पाटील
झोनल प्रमुख-नाशिक क्षेत्र


ऑफिस : गाळा नं. १,४,६,८ महावीर इंडस्ट्रियल इस्टेट,
नारिंगी फाटा, विरार (पूर्व),
ता. पालघर, जि. ठाणे - ४०१३०५ (महाराष्ट्र)
कार्यालय : (०२५०) २५२७३२०/९८२२८८५५२६
ई-मेल : rajinustries2010@yahoo.in
janardanpatil6500@gmail.com
वेबसाईट : www.vijayaengineeringworks.com
www.rajindustries.net.in

मे. विजया इंजिनिअरींग वर्क्स



मॅन्यु : स्पेशालिस्ट प्लास्टिक
इंजेक्शन मोल्ड आणि ब्लो मोल्ड
(घेर ओरम टाईप डाईज)

मे. राज इंडस्ट्रीज




मॅन्यु. फार्मास्यूटिकल्स कॅप्स (कोलॅप्सीबल आणि लॅमी ट्युब कॅप्स),
पेस्टीसाईड पॅकेजींग, एच.डी. आणि पी.पी. बॉटल



बाबाजी कंस्ट्रक्शन कं.

सिडको आणि सरकारमान्य प्राप्त १ रुम हॉल किचन, २ रुम हॉल किचन
दुकानाचे गाळे तसेच इन्डस्ट्रीअल गाळे कर्ज सुविधांसहित योग्य भावात मिळतील.

जनार्दन ह. पाटील
राकेश ज. पाटील
अंचित रा. पाटील
कुशल रा. पाटील